# गुंतवणूक परिसंवादात पार्लेकरांचा उत्साही सहभाग






Aditya Birla Sun Life Mutual Fund
ADITYA BIRLA CAPITAL
MUTUAL FUNDS
प्रस्तुत
लोकसत्ता
अर्थभान

भविष्याचे सुंदर स्वप्न पाहा आणि त्या स्वप्नपूर्तीसाठी सूज्ञतेने व थोडी थोडकी का होईना पण नियमित गुंतवणूक करत राहा, हा ध्यासच सध्याच्या अनिश्चित जगात निभाव लागण्याचा उत्तम मार्ग आहे, असा सांगावा असलेले 'लोकसत्ता अर्थभान'चे विशेष सत्र लोकमान्य सेवा संघ, पु. ल. देशपांडे सभागृह, विलेपार्ले (पूर्व) येथे रविवारी सायंकाळी झाले. कुटुंबाचे आर्थिक नियोजन, संपत्ती निर्मिती कशी करता येईल या प्रश्नांच्या उत्तरासह, या संपत्तीला सायबर धोक्यांपासून जपण्याचे खूपच साधे-सोपे उपाय, येथपासून ते आपल्यापश्चात कोणत्याही तंट्याविना स्वकियांमध्ये संपत्तीच्या हस्तांतरणासाठी आवश्यक 'इच्छापत्र' कसे करावे, याचे सुबोध मार्गदर्शन या कार्यक्रमांत, (व्यासपीठावर उजवीकडून) वित्तीय नियोजनकार व स्तंभलेखक कौस्तुभ जोशी, आदित्य बिर्ला सन लाइफ मुच्युअल फंडाचे आशय व्यवस्थापक नीलरत्न चौबळ आणि ज्येष्ठ सनदी लेखापाल दीपक टिकेकर यांनी केले, तर सूत्रसंचालक म्हणून सुनील वालावलकर यांनी भूमिका बजावली. परिसंवादाला पार्ल्यातील गुंतवणुकोत्सुक श्रोत्यांनी लक्षणीय संख्येने उपस्थिती लावण्यासह, त्यांचे प्रश्न, अडचणी वक्त्यांना मोठ्या प्रमाणात विचारून उत्साही सहभागही दर्शविला.